नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ०२/०५/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन जन्मठेपेची शिक्षा

पो.स्टे. देवलापार :– दिनांक १६/०७/२०१४ चे २३.३० वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. देवलापार येथे अप. क्र. ३६/२०१४ कलम ३०२, ३०७, ३४, १४७, १४३, १४४ भादवी सहकलम ३, २४ आर्म ॲक्ट कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक १५/०७/२०१४ चे १८.३० वा. चे सुमारास मृतक नामे– धनेश बंशीधर गुप्ता, वय ३५ वर्ष, रा. देवलापार हा आपले मोबाईल दुकानात बसला असता आरोपी क्र. १. तुफान ईंदल यादव, वय ३६ वर्ष, २. सुनिल गोपाल यादव, ३. मलखान अशरफीलाल यादव, वय ३५ वर्ष व ४. प्रेमलाल अशरफीलाल यादव, वय २८ वर्ष, रा. चोरबाहुली यांनी गैरकायदयाची मंडळी तयार करून भांडणाचे कारनाणावरून मृतकाचे दुकानात जावून त्याला बंदुकातुन गोळी मारून जिवानिशी ठार केले. आरोपीला दिनांक १९/०७/२०१४ चे २३.१५ वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन सहायक पोलीस निरीक्षक श्री. हंसराज उंदीरवाडे, पो.स्टे. देवलापार यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिनाक ३०/०४/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. पाटील, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद चारही आरोपीतांना कलम ३०२, ३२४, ३४ भादवी मध्ये जन्मठेपेची शिक्षा आरोपी क्र. १ याला कलम ३, २५ आर्म ॲक्ट मध्ये २ वर्ष शिक्षा व ३५०००/–रू. दंड व दंड न भरल्यास ४ महिने सश्रम कारावास आरोपी क्र. २,३,४ यांना प्रत्येकी ३०,०००/–रू. दंड व दंड न भरल्यास ३ महिने सश्रम कारावास शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. सत्यनारायण यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी व कर्मचारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, सुनिल डोंगरे, भवानीप्रसाद मिश्रा, पोहवा श्री. मनोज तिवारी व पोहवा प्रकाश जावरकर पो.स्टे. देवलापार यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर